Vol 4 Issue 9 June 2015
ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
**Review Of Research**
ISSN 2249-894 Impact Factor :3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 9 | June - 2015 Available online at www.ror.isrj.org

# डॉ. बाबासोहब आंबेडकरांचे आर्थिक विचार

*राजेंद्र धाये*
'सहयोगी प्राध्यापक' ,इतिहास विभागप्रमुख संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना.

Short Profile
Rajendra Dhaye is working as an Associate professor at Department of history in College of Sant Ramdas , Ghanasavangi , Jijalana .



***प्रस्तावना :***

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक असामान्य व्यक्तिमत्व, प्रखर राष्ट्रवादी तसेच शोषितांचे हित जोपासणारे अर्थतज्ञ. त्यांना दलितांचे उध्दारकर्ते, कैवारी, दलितांचे नेते या एका मर्यादीत चौकटीतच बसवले जाते. परंतु त्यांच्या कार्यांचा आणि विचारांचा आवाका बघीतल्यानंतर, अभ्यासल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त दलितांचे उध्दारकर्ते नसून ते संपूर्ण भारतीयांचे, शोषीतांचे उध्दारकर्ते होते असेच म्हणावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबडेकर कायद्याबरोबरच राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास व मानववंशशास्त्राचे अभ्यासक तसेच एक अर्थतज्ञही होते. त्यांनी विविध स्वरुपाचे आर्थिक विचार मांडले. अर्थशास्त्रीय विचारांत, अभ्यासात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे या विषयातील निरिक्षण आणि विश्लेषण अत्यंत महत्त्वाचे आहे. अर्थशास्त्र हा त्यांच्या अध्ययन व चिंतनाचा विषय होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय अर्थव्यवस्थे बरोबरच भारतातील कर व्यवस्था, जमीन महसूल, व्यापार, शेती, उद्योगधंदे, चलन याविषयी आपले विचार मांडले. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा 'अर्थशास्त्रज्ञ' हा पैलू तसा दूर्लक्षितच राहिला. त्यांच्याविषयी डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, "जागतिक पातळीवर अर्थतज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांची ख्याती झाली आहे. मात्र भारतात त्या प्रमाणात अर्थतज्ञ म्हणून त्यांना स्थान प्राप्त झालेले नाही." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारात व्यापकता होती. जातीव्यवस्थेचे अर्थशास्त्र, अस्पृश्यतेचे अर्थशास्त्र, समाजवाद, हिंदूत्ववाद, साम्यवाद इत्यादी बाबतीत त्यांचे आर्थिक विचार अत्यंत सखोल आणि चिंतनीय स्वरुपाचे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे संशोधक आणि अभ्यासक असल्यामुळे त्यांच्या आर्थिक विचारांना अर्थशास्त्रीय पार्श्वभूमी आहे. त्यांनी आपले आर्थिक विचार प्रबंध लेखन, लेख, भाषणे, जाहीरनामा व विधेयकाच्या स्वरुपात मांडले.

आधुनिक भारताच्या जडण–घडणीमध्ये, राष्ट्र म्हणून भारताच्या उभारणीमध्ये अनेकांचे योगदान आहे. आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जडण–घडणीत अनेकांचे योगदान असले तरी आर्थिक जडण–घडणीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे, त्यांनी इ.स. 1921 मध्ये ष्लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून' ष्डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी मिळविली. ती पण अर्थशास्त्र हा विषय घेऊन. अर्थशास्त्राचे उच्चशिक्षण घेत असतांना आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. भारतात आल्यानंतर त्यांनी अर्थशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिले नसले तरी इतर विषयांमध्ये त्यांनी जी महत्त्वपूर्ण ग्रंथनिर्मिती केली, त्या बहूतेक सर्व ग्रंथांना अर्थशास्त्राचे परिमाण असल्याचे दिसून येते. त्यामध्ये जातीव्यवस्था, अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांच्या आर्थिक परिमांणाची त्यांनी केलेली अभ्यासपूर्ण मिमांसा यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्याशिवाय त्यांनी वेळोवेळी केलेली भाषणे, तसेच कारणपरत्वे ब्रिटीश सरकारला सादर केलेली निवेदने आणि दिलेल्या साक्षी या आर्थिक विचारांनी ओतप्रोत भरलेल्या दिसून येतात. मुंबई प्रांताच्या विधिमंडळामध्ये तसेच केंद्र सरकारच्या घटना समितीमध्ये त्यांनी युक्तीवाद केले. त्यातून डॉ. आंबेडकरांमधील अर्थतज्ञ सुस्पष्ट प्रतीत होतो. किंबहूना डॉ. आंबेडकरांनी वेळोवेळी ज्या राजकीय आर्थिक आणि सामाजिक चळवळी उभ्या केल्या त्या सर्व आंदोलनांवर अर्थतज्ञ म्हणून एक वेगळाच ठसा उमटलेला दिसून येतो. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय कामगिरीला समाजमान्यता मिळालेली नाही त्याबद्दल सखेद आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही.[1] डॉ.आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन हे प्रामुख्याने प्रबंधाच्या स्वरुपात आहे. कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्रातील एम.ए.च्या पदवीसाठी 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन' हा शोध निबंध लिहला. हा त्यांचा अर्थशास्त्रावरील पहिला प्रबंध. त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाला एम.ए.च्या पदवीसाठी 15 मे 1915 साली अपूर्णरित्या सादर केला, या शोधनिबंधात डॉ. आंबेडकरांनी इ.स. 1792 ते 1858 या कालखंडातील ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन यासंबंधीच्या धोरणातील बदलांचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. हे बदल भारतीय जनतेला कसे अन्यायकारक ठरले, याचे विदारक आर्थिक चित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले आहे.[2] ईस्ट इंडिया कंपनी व्यापाराच्या उद्देशाने भारतात स्थिरावली आणि देशभर तिचा विस्तार वाढला. 1858 साली ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करण्यात आली, त्यावेळी कंपनी सरकारच्या कर्जाचा बोजा कोणी उचलायचा असा प्रश्न निर्माण झाला. त्या संदर्भात ब्रिटीश पार्लमेंटमध्ये आणि इतरत्र भारतीय जनतेच्या बाजूने जे युक्तीवाद करण्यात आले, त्यातील अत्यंत चपखल आणि समर्पक मुद्दे उद्धृत करुन कंपनी सरकारवर त्यावेळी असलेल्या 693 लाख पौंड कर्जाचा बोजा आधीच दारिद्रयग्रस्त असलेल्या भारतीय जनतेवर टाकून ब्रिटीश सरकारने कसा अन्याय केला आहे त्याचे प्रभावी चित्रण डॉ. आंबेडकरांनी केले आहे.[3] शेवटी इंग्लंडने भारताला काय दिले हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'भारताने इंग्लंडला अमाप दिले आणि इंग्लंडकडून भारताला अक्षरशः काहीही मिळाले नाही'[4] ही दोन्ही विधाने आश्चर्यकारक वाटतील. परंतु आर्थिक दृष्टीकोनातून पाहिले तर त्यातील सत्यता निर्विवाद आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीएच.डी. च्या पदवी करीता 'A National Dividend of India : A Historical and Analytical study' (भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासीक आणि विश्लेषणात्मक अभ्यास) हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठात सादर केला. त्यानंतर 1924 साली हा प्रबंध Evolution of provincial finance in British India (ब्रिटीश भारतातील प्रांतीक वित्ताचा उगम) या नावाने ग्रंथरुपाने प्रसिध्द झाला.5 या ग्रंथात ब्रिटीश केंद्र सरकार आणि त्यावेळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध इ.स. 1833 ते 1929 या प्रदीर्घ कालखंडात कसकसे विकसित झालेत त्याची ऐतिहासीक मिमांसा केली आहे.[6] या ग्रंथातून डॉ. आंबेडकरांची अर्थशास्त्रीय दृष्टीकोनाची बौध्दीक पात्रता आणि विश्लेषणात्मक योग्यता सिध्द होते. त्याचबरोबर या ग्रंथामूळेच स्वातंत्र्योत्तर काळात अनेक वित्त आयोगांनी केंद्र–राज्य आर्थिक संबंधाची जी पुनर्रचना केली त्याला डॉ. आंबेडकरांचे मुलग्राही विवेचन पायाभूत ठरले आहे. या प्रबंधात डॉ. आंबेडकरांनी ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या हिन्दुस्थानातील पिळवणूकीवर प्रकाश टाकला आहे.

'The problem of the Rupee : Its origin and its solution' हा डॉ. आंबेडकरांचा मौद्रक अर्थशास्त्रावरील महत्वाचा प्रबंध. याच प्रबंधावर त्यांना डी.एस्सी. ही सर्वोच्च पदवी प्रदान करण्यात आली. हाच ग्रंथ 1947 मध्ये 'History of Indian currency and Banking' या नावाने प्रकाशीत करण्यात आला. प्रस्तूत ग्रंथात भारतीय रुपयाची उत्क्रान्तीची

ऐतिहासीक मिमांसा करण्यात आली आहे. 1800 ते 1893 या काळात भारतीय रुपयाची, चलनाचे परिमाण म्हणून कशी जडण–घडण होत गेली, याचे विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात.

भारतातील चलन आणि वित्ताच्या रॉयल कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकरांनी 15 डिसेंबर 1925 ला साक्ष देतांना स्पष्टपणे नमूद केले होते की, चलन निर्मिती करणाऱ्या संस्थेच्या चलन निर्मितीच्या क्षमतेवर अंकूश असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अनिर्बंध चलनपुरवठा आणि त्यातून भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.[7] आज देखील चलन निर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी मांडलेले विचार महत्त्वाचे आहेत. भारतीय रुपयाच्या अवमूल्यनाचा प्रश्न आजही कायम आहे. त्यांच्यामते 'सुवर्णमानक' हेच भारतासाठी योग्य होते. आपल्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ ते अनेक ऐतिहासिक पुरावे देतात.

प्रोफेसर किन्स आणि इतर अनेक अर्थतज्ञांनी सुवर्णविनिमय परिमाणाचा पुरस्कार केला होता. त्यांचे म्हणणे असे की, हे परिमाण लवचिक आहे. देशामध्ये चलननिर्मिती किती व्हावी ते या व्यवस्थेमध्ये देशाच्या सोन्याच्या साठ्यावर अवलंबून नसल्यामुळे, चलननिर्मितीवर अनाठायी बंधने राहात नाहीत आणि म्हणून, भविष्यकालीन दृष्टीकोनातून भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे परिमाण सुयोग्य ठरेल. डॉ. आंबेडकरांनी त्याला कडाडून विरोध केला. त्यांचा युक्तीवाद असा होता की, सुवर्णविनिमय परिमाणामध्ये लवचिकता जरुर असेल, मात्र लवचिकता हे दुधारी अस्त्र आणि परिणामतः भाववाढ होऊन रुपयाची किंमत घसरु शकते. त्यामुळे विनिमयाचे साधन म्हणून रुपयाचे स्थान डळमळीत होण्याची शक्यता संभावते.[8] सुवर्णपरिमाण असताना भारतातील किंमती कशा स्थिर होत्या आणि सुवर्णविनियम परिमाण प्रचलित असताना कशी भाववाढ झाली होती याविषयी डॉ. आंबेडकर पुराव्यानिशी विवेचन करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते रशिया सारख्या साम्यवादी राष्ट्रामध्ये आर्थिक समता प्रस्थापित करता येते, पण तेथे व्यक्तीस्वातंत्र्य नसते. म्हणूनच ते घटनात्मक लोकशाहीचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते लोकशाहीमध्ये विचारपूर्ण आर्थिक विकासासाठी यंत्राचा वापर करावा, यंत्राचा वापर वाईट नसून सामाजिक रचनाच चूकीची असल्यामूळे यंत्राचे वाईट परिणाम दिसून येतात. समाजामध्ये खाजगी मालमत्तेला ।इेवसनजम ीदबजपजल दिल्यामुळे यंत्राच्या उपयोगाचा फायदा सर्व समाजास मिळत नाही. म्हणून अशी समाज रचनाच बदलावी असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले, म्हणजे खाजगी मालमत्तेवर मर्यादा असावी असे त्यांचे मत होते.[9] आधुनिक अर्थशास्त्राचा जन्म अॅडम स्मिथपासून होतो. त्यावेळी अर्थषास्त्र एक उद्वेगजनक ;क्पेउंसद्ध षास्त्र होते. कारण नफा, श्रम, खंड, मजुरी याविषयीच्या संकल्पना बाळबोध स्वरुपाच्या होत्या. राष्ट्राच्या साधनसामुग्रीमध्ये मजुरांना काहीही स्थान नव्हते. थोडक्यात अर्थशास्त्राचा मानवी जीवनाशी असलेला मुलगामी व दूरगामी संबंध त्यातून स्पष्ट होत नव्हता, ते निव्वळ गरजांचे, त्यातही मागणी पुरवठ्यांशी संबंध असलेल्या गरजांचे शास्त्र होते. समाज परिवर्तनाचे, प्रगतीचे उन्नतीचे शास्त्र म्हणून मार्क्सनंतरच त्याला मान्यता मिळाली. ...... मार्क्सला अभिप्रेत होते की, जगातील सर्व श्रमिक एक होतील आणि या आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पिळवणूकीचा अंत करतील. परंतु भारतात तसे होणे शक्य नव्हते. कारण येथील श्रमिक, जातीव्यवस्थेत विभागलेला होता आणि विभागलेला आहे. अशा अभेद्य समाज व्यवस्थेत क्रांती होऊ शकत नाही. वर्ग बदलू शकतात, जात बदलता येत नाही. म्हणूनच समाजव्यवस्था तिच्या सर्व दुर्गूणांसह चिरंतन टिकून राहते. त्यामूळे डॉ. आंबेडकरांच्या विचारव्यवस्थेत जाती विचारव्यवस्थेचे उच्चाटन कसे करता येईल? आणि समाज जातीमुक्त कसा होईल? हे महत्वाचे उद्दीष्ट होते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेशी, इथल्या धर्मव्यवस्थेशी, सांस्कृतिक राज्यव्यवस्थेशी अखंड संघर्ष केला. एकदा उद्दिष्ट निश्चित झाल्यानंतर मार्क्स प्रमाणेच डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्र एक विषय न मानता सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक परिवर्तनाचे शस्त्र मानले.[10] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या स्वरुपात बदल झाला पाहिजे. कारण, त्याशिवाय आर्थिक गुलामगिरीच्या पाशातून, शोषित, बंदिस्त यांची सोडवणूक करता येणार नाही. ग्रामीण भागातील जातीव्यवस्थेमुळे आर्थिक विकासास एक प्रकारची खिळ बसते. ठराविक जातीच्या माणसांना आर्थिक गुलामगिरी सहन करावी लागते. म्हणूनच जातीव्यवस्थेच्या शृंखला तुटल्याशिवाय केवळ विशिष्ट समुहाचाच नाही तर देशाचाही आर्थिक विकास होऊ शकणार नाही.

लोकांच्या आर्थिक जीवनात क्रांतीकारक परिवर्तन घडवून आणण्यासाठीच राजकीय लोकशाहीचे सामाजिक – आर्थिक लोकशाहीत रुपांतर करावे लागेल, असा आग्रह ते धरतात. शैक्षणिक बंदीमधून समाजाचा विकास कुंठीत झाला आहे. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. हा भेदभाव दूर करण्याचे धोरण आवश्यक आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विकासाच्या नव्या संकल्पना देशाला दिल्या. देशाचे उद्योगधंदे शेतीमालाची प्रक्रिया करणारे आणि शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणारे असावेत, जमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे,

उद्योगधंदे सरकारी मालकीचे असावेत, जनतेच्या शिक्षण–आरोग्य आदींसह सेवांची जबाबदारी सरकारची असावी, अशा समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार त्यांनी केला.[11] आर्थिक गुलामगिरीचे पाश तोडण्यासाठी व ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परंपरागत चौकट खिळखिळी करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी क्रान्तीकारक स्वरुपाचे विचार मांडले. यासाठी शेतजमीनीचे राष्ट्रीयकरण करण्यात आले पाहिजे असा क्रांतीकारक विचार त्यांनी मांडला, ग्रामीण समाजातील परंपरागत चौकटीतील आर्थिक गुलामगिरीविरुध्द दलितांनी, शोषितांनी आवाज उठविला पाहिजे.[12] अशा प्रकारे प्रचलित समाज व्यवस्थेला हादरा देणारे, आर्थिक विषमता मोडीत काढणारे विचार त्यांनी मांडले.

मूलभूत हक्क म्हणजे केवळ राजकीय हक्क होत, असा आजपर्यंतचा समज आहे. त्यामूळेच आर्थिक बाजूकडे दूर्लक्ष करण्यात आलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र राजकीय आणि आर्थिक हक्काचा विचार एकत्र केला. त्यांच्या मते, राजकीय हक्कांबरोबर आर्थिक स्थैर्यासाठी घटनेचा आधार घेणे अत्यावश्यक असते. असे मत मांडण्यामागे त्यांचा मुख्य हेतू म्हणजे, एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालू नयेत, हा होता. मूलभूत हक्क, व्यक्तीस्वातंत्र्य आणि समाजाची आर्थिक घडण यातील संबंध सामान्यतः स्पष्ट होत नाहीत. परंतु खरा संबंध या बाबींचाच असतो, असे मत डॉ. बाबासाहेबांनी मांडले.[13] जातीव्यवस्थेमुळे भारताची आर्थिक प्रगती आणि विकास कसा खुंटला आहे त्याचे मुलगामी विवेचन डॉ. आंबेडकर करतात. जातीव्यवस्थेमुळे श्रमशक्ती आणि भांडवल हे उत्पादनाचे दोन्ही महत्वाचे घटक हे जीथे त्यांची उपयुक्तता जास्तीत जास्त आहे, अशा ठिकाणी वापरले न जाता पारंपारीक जातिनिहाय पध्दतीने अर्थव्यवस्थेमध्ये त्याचे वाटप होते. त्याशिवाय या दोन्ही घटकांची सचलता (Mobility) सीमित राहाते. त्यामुळे उत्पादनप्रक्रिया अकार्यक्षम होऊन आर्थिक प्रगतीला खीळ बसते. जी गोष्ट आर्थिक प्रगतीची, तीच गोष्ट आर्थिक विकासाची. कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासाचे मर्म असते ते सातत्याने बदलत राहाणाऱ्या आर्थिक–सामाजिक रचनेमध्ये. जातीव्यवस्थेमध्ये पारंपारीक आर्थिक–सामाजिक रचनेला चिकटून राहण्याचा गुणधर्म असल्यामुळे आर्थिक विकासाला बाध येतो, असा युक्तीवाद डॉ. आंबेडकरांनी केला आहे.[14] त्याही पुढे जावून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‱अस्पृश्यता ही केवळ धार्मिक रचना नसून गुलामगिरीपेक्षाही भयंकर अशी आर्थिक रचना आहे. गुलामगिरीमध्ये मालक हा गुलामाला खाऊ पिऊ घालून, कपडलत्ते देऊन कमीत कमी त्याला माणूस म्हणून वागण्याची (अन्यथा त्या गुलामाची बाजारात किंमत कमी होणार म्हणून) जबाबदारी स्वीकारतो. त्याउलट अस्पृश्यता ही अशी रचना आहे की, जिच्यामध्ये मालकावर काहीही जबाबदारी न येता अव्याहतपणे अस्पृश्य समाजाची आर्थिक पिळवणुक करता येवू शकते.’[15] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीसंस्थेने शोषण केलेल्या शोषीतांसाठी आपले आर्थिक विचार मांडले.

डॉ. आंबेडकरांनी आर्थिक उपायांची प्रभावी अमल बजावणी करण्यासाठी राज्यघटनेचा आश्रय महत्त्वाचा मानला. कारण समाजवादी समाज रचना निर्माण करण्यासाठी राज्य संस्थेचे अस्तित्व महत्त्वाचे असते. राज्य संस्थेवर ज्यांची पकड असते ते देशातील अर्थकारण विशिष्ट हितसंबंध जपण्यासाठीच राबविण्याचा प्रयत्न करतात. जे सधन किंवा प्रबळ असतात. त्यांची धोरणे स्वहितासाठी प्रामुख्याने असतात. राजसंस्थेने नियंत्रण केल्याशिवाय देशात समाजवादी समाज रचना निर्माण होवू शकणार नाही. अशा परिस्थितीत दुर्बलांची व पिडीतांची आर्थिक गुलामगिरी कायम राहील व त्यांचे आर्थिक शोषण होईल. त्यासाठी राज्यसंस्थेचे स्वरुप बदलले पाहिजे आणि राज्यघटनेतील तरतुदीच्या आधारे अनेक प्रश्नांची उकल होवू शकते. देशातील आर्थिक समतेचे किंवा समाजवादी समाज रचनेचे स्वप्न साकार करण्यासाठी नियोजित अर्थव्यवस्थेत विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी.[16]

‘लहान शेतजमिनी आणि त्यावरील उपाय‱ यावर डॉ. आंबेडकर यांनी ‘जर्नल ऑफ इंडियन एकॉनॉमीक सोसायटी’ च्या नियतकालीकात लेख लिहिला होता. विखुरलेल्या जमिनींच्या तुकड्यांमुळे होणारे दुष्परिणाम जमिनीच्या एकत्रीकरणामुळे कमी होतील, पण एकत्रित आणलेल्या जमिनी जर आर्थिक दृष्टींनी फलदायी नसतील तर त्यांचा काही उपयोग नसतो असे त्यांना वाटत होते, ‘योग्य तो खर्च दिल्यानंतर, स्वतःला व कुटूंबाला योग्य अशा सुखात राहण्यासाठी ज्या ठिकाणी उत्पन्न निघते‱ ही नेहमीची आर्थिक दृष्टींनी फलदायी शेतजमीनीची व्याख्या त्यांनी मान्य केली नव्हती, त्यावर टिकाच केली होती. ही व्याख्या उत्पादनावर अधिष्ठीत नसून उपभोगावर (कंझम्शन) अधिष्ठीत असते अशी टिका त्यांनी केली.[17] शेतकरी, शेतमजूर, जमीनदारशाही इत्यादी घटकांवर त्यांनी विपूल लेखन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक लेखनाचा, आर्थिक विचारांचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस राहिलेला आहे. त्यांना आर्थिक भेद निर्माण करणारी व्यवस्था, संस्कृती मान्य नव्हती.

जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नावर जमीन–महसूल अवलंबून ठेवण्यातील अन्याय आंबेडकरांनी दाखवून दिला होता.

प्राप्तिकर कायद्याच्या तरतुदीप्रमाणे जमीन–महसुलाची वसुली व्हावयास पाहिजे असे त्यांचे मत होते. डॉ. जॉन मथाई यांच्या अध्यक्षतेखालील करचौकशी समितीनेही शेतीवरील प्राप्तिकराला उचलून धरले होतेच. जमीनदारशाही व महारवतने रद्द करणे यावर आंबेडकरांनी दिलेला भर लक्षात घेण्याजोगा होता. त्याला ते आर्थिक लढा म्हणत किंवा पिळणाऱ्यांविरुध्द पिळल्या जाणाऱ्या वर्गाचा लढा असे म्हणत. या बाबतीत त्यांचे विचार अद्ययावत् होते, पुरोगामी होते असे आढळून येईल.[18]

भारतातील औद्योगिकरण विकेंद्रीत व शिस्तबध्दपणे व्हावे, ह्या उद्देशाने 1951 साली जो औद्योगिक विकासाचा कायदा करण्यात आला, त्यामध्ये 'परवाना पध्दती' निर्माण करण्यात आली. एका ठराविक मर्यादेपलिकडे भांडवल गुंतवणूक करावयाची असल्यास वा औद्योगिक क्षमतेचा विस्तार करावयाचा सरकारकडून असा परवाना मिळणे अपरिहार्य झाले. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळणे, हा देखील या धोरणाचा एक प्रमुख उद्देश होता. परंतु ह्यांचा परिणाम असा झाला की परवाना देण्याचे अधिकार असलेले प्रशासकीय अधिकारी व राज्यकर्ते अशा हितसंबंधियांचा एक प्रभावी वर्ग तयार झाला. त्यातून एक भ्रष्ट व्यवस्था अस्तित्वात आली. पुढे ही नियंत्रणे सगळ्याच क्षेत्रात आली व भ्रष्टाचाराची व्याप्ती वाढली. परवानापध्दती व नियंत्रणे यांचा मूळ उद्देश बाजूलाच राहिला. देशाच्या औद्यागिकरणावर मात्र त्यांचा काही प्रमाणात विपरीत परिणाम झाला.[19]

डॉ.आंबेडकरांच्या मते शासनाचा अर्थव्यवस्थेत परिणामकारक हस्तक्षेप असणे अत्यावश्यक आहे. शासनाचा अर्थव्यवस्थेत असा परिणामकारक हस्तक्षेप नसला तर आर्थिक व्यवहारांचे नियमन करण्यासंबंधीचे सर्व स्वातंत्र्य हे खाजगी क्षेत्र व उद्योजक यांच्या हाती जाईल. हे खाजगी उद्योजक जे निर्णय घेतील (उदा. मुंबईतील अनेक गिरण्या बंद करण्याचा वा गिरण्यांची जमीन विकण्याचा गिरणीमालक घेत असलेला निर्णय) हा श्रमजीवी जनतेच्या, कामगारांच्या हिताचा असलेच, असे नव्हे, स्वतःच्या हिताला बाधा आणणारे कोणतेही धोरण खाजगी उद्योजकांच्या दृष्टीने त्याज्य ठरते, मग ते धोरण सामान्य जनतेच्या दृष्टीने कितीही हितकारक असले तरी त्यांची त्यांना पर्वा नसते. म्हणूनच स्वातंत्र्याच्या नावाखाली जी मंडळी शासनाचा अर्थव्यवस्थेतील हस्तक्षेप कमीत कमी असला पाहिजे असे म्हणतात, त्यांना टोला लगावताना डॉ.आंबेडकर म्हणतात की, शासनाचा अर्थव्यवस्थेतील कमीत कमी हस्तक्षेप याचेच दुसरे नाव ष्खाजगी उद्योजकांची हुकमशाहीष असे आहे.[20] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले आर्थिक विचार मांडले ते सर्वच क्षेत्रासांठी व सामान्य माणसासाठी.

### *सारांश :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना एक दिशा होती. आर्थिक समता हा त्यांच्या विचारांचा पैलू होता. सामान्यांचे आर्थिक हित अबाधीत राहावे, सामान्यांना संपती असावी, मिळावी हाच त्यांच्या आर्थिक विचारांचा महत्त्वाचा गाभा होता. सामान्यांसाठी संपत्तीचे विभाजन त्यांना महत्त्वाचे वाटत होते.

थोडक्यात, मानवाच्या आर्थिक विमोचनासाठी मार्क्सने उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची झाली पाहिजेत, हा विचार मांडला. परंतु त्यामध्ये व्यक्तीस्वातंत्र्यावर मर्यादा टाकली जाते. केन्सने रोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी उत्पादनाची मोठी साधने राज्याच्या नियंत्रणाखाली आणावीत, असा विचार प्रतिपादीत केला. परंतु त्यांनी भांडवलशाहीचा पुरस्कार केला. म. गांधींनी श्रीमंतांना संपत्तीचे 'ट्रस्टीज' मानले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तीस्वातंत्र्य अबाधीत राखून 'घटनात्मक सांसदिय राज्य समाजवादा' ची कल्पना मांडून मानवाच्या आर्थिक उत्थानाचा ष्मध्यम मार्गाचाष नवा विचार मांडला. हा विचार भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध समस्या निश्चित सोडवू शकेल. 21

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांच्या संदर्भात एवढेच म्हणावे लागेल की, त्यांनी आर्थिक समस्यांचा विचार करताना, आर्थिक विचारांचे लेखन करतांना गरीब माणुस केंद्रस्थानी राहीलेला आहे.

### *संदर्भ :*

1.प्रा. मेश्राम केशव, नरके हरि, व इतर (संपादक मंडळ), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य

मंडळ मुंबई, पुनर्मुद्रण–1999, पृ. क्र. 361–362
2.डॉ. आंबेडकर बी.आर., ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन, विनिमय प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती 6 डिसेंबर 2011, पृ.क्र. 3
3.प्रा. मेश्राम, नरके हरि व इतर (संपादक मंडळ), उपरोक्त, पृ.क्र. 364–365
4.डॉ. आंबेडकर बी.आर., उपरोक्त, पृ.क्र. 3
5.उबाळे देवेंद्र व इतर (संपादक मंडळ), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन आणि चळवळीची दिशा, डॉ. आंबेडकर वाङ्मयीन अभ्यासमंडळ, इगतपुरी, प्रथमआवृती 13 मे 2006, पृ.क्र. 68
6.निंबाळकर वामन (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 14 आक्टो. 2006, पृ. क्र. 113
7.कित्ता, पृ. क्र. 116
8.प्रा. मेश्राम, नरके हरि व इतर (संपादक मंडळ), उपरोक्त, पृ. क्र. 371
9.उबाळे देवेंद्र व इतर (संपादक मंडळ), उपरोक्त, पृ. क्र. 45–46
10.कित्ता, पृ. क्र. 81–82
11.डॉ.लुलेकर प्रल्हाद, अनंत पैलूंचा सामाजीक योध्दा दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन पुणे, पुनर्मुद्रण–2014, पृ. क्र. 155–156
12.गवळी टि.ए. (संपादक) आणि इतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ प्रचार प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती 14 एप्रील 1991, पृ. क्र. 357
13.उबाळे देवेंद्र व इतर (संपादक मंडळ), उपरोक्त, पृ. क्र. 49
14.प्रा. मेश्राम केशव नरके हरि व इतर (संपादक मंडळ), उपरोक्त, पृ. क्र. 373
15.कित्ता
16.गवळी टि.ए. आणि इतर (संपादक), उपरोक्त, पृ. क्र. 361
17.डॉ.कुबेर वा.ना., डॉ. आंबेडकर : विचारमंथन, सुगावा प्रकाशन, पुर्ण आवृत्ती तिसरी, फेब्रुवारी– 1998, पृ. क्र. 237–238
18.कित्ता, पृ. क्र. 255
19.मुणगेकर भालचंद्र, नवीन आर्थिक धोरण : आंबेडकर प्रणित दृष्टीकोन, सुगावा प्रकाशन पुणे, 14 नोहेंबर–1995, प्रथमावृत्ती, पृ. क्र. 26
20.कित्ता, पृ. क्र. 13
21.उबाळे देवेंद्र व इतर (संपादक मंडळ), उपरोक्त, पृ. क्र. 54

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org